


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १५४ •बुधवार, दि. ०३ सप्टेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# मराठ्यांचा ऐतिहासिक विजय, सरकारकडून मनोज जरांगे पाटील यांची मागणी मान्य




## हैदराबाद गॅझेटिअरची तातडीने अंमलबजावणी करणार; मराठा उपसमितीचा मनोज जरांगेंना शब्द

**मुंबई । प्रतिनिधी**

मनोज जरांगे यांच्या मराठा आंदोलनाला मोठं यश मिळालं असून मराठा समितीने हैदराबाद गॅझेटिअर मान्य असल्याचं सांगितलं. त्यानुसार गावातील, नात्यातील, कुळातील लोकांना चौकशी करुन कुणबी प्रमाणपत्र देणार असल्याचं उपसमितीने मनोज जरांगे यांच्यासमोर मान्य केलं. तसेच सातारा गॅझेटिअरच्या मागणीवर जलदगतीने निर्णय घेणार असल्याचंही उपसमितीने मान्य केलं. मनोज जरांगेंनी आझाद मैदानातील उपोषणाची सांगता केल्याचं जाहीर केलं. यावेळी त्यांनी राज्य सरकारचे आभार मानले. मराठा आणि कुणबी एकच असल्याची मागणी जरांगे यांनी केली होती. त्यावर ही प्रक्रिया किचकट आहे, त्यासाठी एक-दोन महिन्यांचा वेळ द्यावा अशी मागणी उपसमितीने केली आहे.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी आठ मागण्या केल्या होत्या. त्यावर मराठा उपसमितीकडून सहा मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. हैदराबादच्या गॅझेटिअरची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येणार आहे. तसेच उपसमितीने मसुद्यात ज्या गोष्टी नमूद करण्यात आल्या आहेत त्यावर तातडीने

▶▶ उर्वरित पान २ वर

### • मराठा आणि कुणबी एकच मागणीवर वेळ मागितला

**मनोज जरांगे यांनी या मागण्या मान्य केल्या तर त्यासंबंधी तातडीने जीआर काढतो आणि त्याची अंमलबजावणी करतो असा शब्द मराठा उपसमितीने दिला. पण मराठा आणि कुणबी एकच आहेत ही मनोज जरांगे यांच्या मागणीवर तूर्तास निर्णय घेण्यात आला नाही. ही प्रक्रिया किचकट असल्याने त्याला एक-दोन महिन्यांचा वेळ द्या अशी मागणी उपसमितीने केली आहे.**



*छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ शिवप्रेमी जरांगे पाटलांच्या घोषणा देत आरक्षण मिळाल्याबद्दल आनंद उतस्व साजरा करताना.*

## मराठा आरक्षणाच्या मागण्या मान्य करताच वडवणीत दिवाळी साजरी

**वडवणी । प्रतिनिधी**

आनेक वर्षे झाले मराठा आरक्षण मिळवण्यासाठी संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी आपल्या कुटुंबाची व जीवाची परवा न करता प्राणांतीक उपोषण केली.गेली २९ ऑगस्ट पासुन मुंबई येथे अन्न पाणी त्याग करत ऊपोषण सुरु केले.संपूर्ण मुंबई जाम केली.सरकारला ना इलाजास्तव मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मागण्या पूर्ण कराव्या लागल्या सरकारने मराठा आरक्षणाच्या



मागण्या मान्य करताच वडवणी शहरासह ग्रामीण भागातील समाज बांधवांनी गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतिषबाजी करत दिवाळी साजरी केली.

गोरगरीब मराठा समाजाला हक्काचे ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे गेले अनेक वर्षापासून आपल्या कुटुंबाची व जीवाची परवाना करता प्राणांतिक उपोषण केली.त्यांच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

## संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटलामुळे गरजवंत मराठ्यांना न्याय मिळाला...! - राजेंद्र मस्के

### सकल मराठा समाजाच्या एकजुटीचा मुख्यमंत्री फडणवीसांनी सन्मान राखला, ऐतिहासिक निर्णयामुळे मराठा समाजाची उन्नती होईल

**बीड । प्रतिनिधी**

अखेर संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांचा अद्भुत लढा आणि मराठ्यांची एकजूटीची दखल घेऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हैदराबाद गॅझेट लागू करून मराठवाड्यातील मराठा बांधवांना कुणबी मराठा आरक्षण देण्याचा घेतलेला निर्णय ऐतिहासिक ठरणार आहे.

हैदराबाद गॅझेट लागू करून कुणबी मराठा समाजाला आरक्षणाचा न्याय देणारा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल मा. मुख्यमंत्री , देवेंद्र फडणवीस साहेब



व राज्यसरकारचे मनःपूर्वक आभार व अभिनंदन. मनोजदादांनी जीवाची बाजी लावुन सातत्याने संघर्ष केला. त्याचं हे योगदान चंद्र सूर्य असेपर्यंत मराठा समाज कदापि विसरणार नाही. हा निर्णय मराठा समाजाच्या संघर्षाला न्याय देणारा आणि भावी पिढ्यांच्या शिक्षण व रोजगाराला नवी दिशा देणारा ठरणार आहे. सरकारचे हे पाऊल समाजाच्या आशा-आकांक्षांना बळ देणारे व समतेच्या वाटचालीला बळकट करणारे आहे. मराठा समाजाच्या वतीने मनःपूर्वक कृतज्ञता.



राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेटियर ला मंत्रिमंडळ उपसमितीने मान्यता दिली, त्यामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र भेटणताचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेन अंदोलनाचे गुन्हे मागे घेणार, सातारा गॅझेटियर लागू करणार, मयत अंदोलकाच्या वारसाना आर्थिक करणार, कुणबी यादी प्रसिद्ध करणार असे अनेक समाजहिताचे निर्णय घेतले आहेत, त्या मुळे आदरणीय मनोज दादा जरागे पाटील यांच्या अंदोलनला यश आले आहे.

**-ॲड योगेश शेळके (जिल्हा व सत्र न्यायालय बीड )**



*बीड शिवपार्क कॉलनी मध्ये श्री गणरायाची आरती करण्याचा मान दैनिक मराठवाडा पत्र चे संपदाक दत्तात्रय नरनाळे, सौं. ज्योती दत्तात्रय नरनाळे व श्री. विठ्ठल काळे पोलीस, सौं. ऋतुजा विठ्ठल काळे आरती करतांना. व या प्रसंगी भाजपा नेते शरद झोडगे पाटील, अंकुश नखाते सर, उंडाळे सर, रोहन काळे, प्रतापसिह झोडगे पाटील आदी भाविक भक्त छायाचित्रात दिसत आहेत.*



*जरांगे पाटील यांच्या आंदोलन विजयाचं खांडे पारगाव येथे फटाके वाजवून स्वागत*

## पोलिस अधीक्षक नवनित कॉवत यांच्या हस्ते आदित्य शिक्षण संस्थेच्या श्रींची आरती

### विद्यार्थांसोबत साधला मनमोकळा संवाद, संस्थेच्या वतीने एपींचा सन्मान



**बीड । प्रतिनिधी**

जिवनात शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासणे महत्वाचे आहे, गणपती उत्सवाप्रमाणे आपले जीवनही आनंदी आणि उत्साही असावं. ताणतणावात जगण्याऐवजी तणावमुक्त जीवन जगणं हीच खरी प्रगती आहे. असे प्रतिपादन बीड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नवनित कॉवत यांनी केले. ते आदित्य शिक्षण संस्थेमध्ये श्रींच्या आरती प्रसंगी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधताना बोलत होते. यावेळी संस्थेच्या वतीने संचालक डॉ.आदित्य सारडा,आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, सी. ए. गिरीशजी गिल्डा यांनी एसपी नवनित कॉवत यांचा सत्कार केला. आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित

▶▶ उर्वरित पान २ वर



# हैदराबाद गॅझेट म्हणजे नेमकं काय ? मराठा आरक्षणासाठी का केला जातो याचा उल्लेख?

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचं गेल्या पाच दिवसांपासून सुरु असलेलं आमरण उपोषण आज संपलं आहे. मराठा समितीने हैदराबाद गॅझेट मान्य असल्याचं सांगितलं आहे. त्यानुसार गावातील, नात्यातील, कुळातील लोकांना चौकशी करुन कुणबी प्रमाणपत्र देणार असल्याचं समितीनं मान्य केलं आहे. मात्र, हैदराबाद गॅझेट म्हणजे नेमकं काय ? हे तुम्हाला माहित आहे का ? जाणून घेऊयात सविस्तर माहिती.

हैदराबाद गॅझेट म्हणजे नेमकं काय ?

हैदराबाद गॅझेट म्हणजे १९१८ साली तत्कालीन हैदराबाद निजामशाही सरकारने जारी केलेला आदेश / गॅझेट. त्याकाळी हैदराबाद संस्थानामध्ये मराठा समाज बहुसंख्य होता आणि त्यांची सत्ता व नोकऱ्यांमध्ये उपेक्षा होत असल्याची नोंद होती. म्हणून निजाम सरकारने मराठा समाजाला हिंदू मराठा या नावाने शैक्षणिक व नोकरीत आरक्षण (काही प्रमाणात राखीव जागा) देणारा आदेश काढला. हैदराबाद निजामशाहीने १९१८ मध्ये




काढलेल्या आदेशात मराठा समाजाला शैक्षणिक व नोकरीतील आरक्षण दिले होते. आजही मराठा समाजाच्या आरक्षण लढ्यात याचाच ऐतिहासिक पुरावा म्हणून हवाला दिला जातो.

हैदराबाद गॅझेटमधील मुख्य मुद्दे कोणते ?

१. हैदराबाद राज्यातील मराठ्यांना शासकीय नोकऱ्यांत व शिक्षणात आरक्षण देण्याचा निर्णय.

२. हा निर्णय अधिकृत गॅझेटद्वारे नोंदवण्यात आला, म्हणून त्याला हैदराबाद गॅझेट म्हटलं जातं.

३. पुढे महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाच्या मागणीदरम्यान इतिहासातील आरक्षणाचा दाखला म्हणून हा गॅझेट वारंवार दाखवला जातो.

४. मराठा समाज आधीपासूनच मागास म्हणून शासकीय कागदपत्रांमध्ये नोंद आहे, असा पुरावा म्हणून याचा वापर होतो.

दरम्यान, हैदराबाद गॅझेट हे निझाम राजवटीतील (१९१८ च्या) एक दस्तऐवज आहे. जो मराठवाडा, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटकातील काही भागांशी निगडित आहे. मराठा–कुणबी नोंदींच्या संदर्भात मराठा आरक्षणासाठी याचा उल्लेख अनेकदा केला जातो.

मराठा आणि कुणबी एकच आहेत. त्यामुळे मराठा समाजाला सरसकट कुणबी समजून ओबीसीतून आरक्षण द्यावे, अशी मागणी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. हैदराबाद, सातारा गॅझेट लागू करुन मराठ्यांना ओबीसी आरक्षण द्यावे असी मागणी त्यांनी केली होती. सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी करावी अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली होती. सरकारने व देवेंद्र फडणवीस यांनी कितीही अन्याय करायचा प्रयत्न केला तरी हैदराबाद व सातारा गॅझेटची अंमलबजावणी झाल्याशिवाय मुंबई सोडणार नसल्याची भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली होती. आज अखेर मराठा समितीने हैदराबाद गॅझेट मान्य असल्याचं सांगितलं आहे. त्यानुसार गावातील, नात्यातील, कुळातील लोकांना चौकशी करुन कुणबी प्रमाणपत्र देणार असल्याचं समितीनं मान्य केलं आहे.

# शाश्वत विकासाची दूरदृष्टीपूर्ण लोकचळवळ; 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'

भारत कृषिप्रधान देश आहे आणि गाव हे त्याचे प्राणकेंद्र आहे. त्यामुळे गावांचे प्रश्न सोडविल्याशिवाय आणि त्यांचा शाश्वत विकास साधल्याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. शाश्वत विकास हा असा विकास आहे, जो सध्याच्या पिढीच्या गरजा भागविताना पुढील पिढ्यांसाठी साधन संपत्तीचे सातत्याने संवर्धन करत राहतो. म्हणूनच गावांचा शाश्वत विकास हा आपल्या राज्याच्या व राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे....

आज अनेक गावांमध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार, रस्ते, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा या मूलभूत गरजांसह रोजगार, माहिती तंत्रज्ञान, शाळांमध्ये शिक्षणाचा उच्च दर्जा, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण सुविधा, प्राथमिक आरोग्य केंद्रे तेथे औषधांची उपलब्धता, तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा अशा प्राथमिक चांगल्या सुविधा उपलब्ध करणे, यासाठी शासन मोठ्या प्रमाणात काम करते.

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ग्रामीण विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. अभियानाचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी १७ सप्टेंबर २०२५ रोजी होणार आहे. ही अंमलबजावणी केवळ स्पर्धात्मक राहणार नसून ग्रामविकास अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप देणारी ठरेल.

हे अभियान राबविण्याची संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आहे. २९ जुलै २०२५ रोजी राज्य मंत्रिमंडळाची यास मंजुरी मिळाली व अभियानाच्या अंमलबजावणीसाठी महत्त्वाचे पाऊल टाकले गेले. अभियान राबविण्यासाठी ₹२९०.३३ कोटींची तरतूद करण्यात आली, त्यापैकी ₹२४५.२० कोटी पुरस्कारांसाठी, तर उर्वरित निधी प्रचार, प्रशिक्षण आणि मार्गदर्शनासाठी वापरण्यात येणार आहे.

अभियानाचे उद्दिष्ट– या अभियानाचा मुख्य उद्देश गावागावात सुशासन प्रस्थापित करणे, ग्रामस्थांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे आणि विकासासाठी स्पर्धात्मक वातावरण तयार करणे आहे. योजना केवळ प्रशासकीय यंत्रणेपुरती मर्यादित नसून, ग्रामस्थांच्या थेट सहभागावर आधारलेली आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकास विभाग शाश्वत विकास साधण्यासाठी ठिबक सिंचन, शेततळी, बंधारे, जलसंवर्धन, जलयुक्त शिवार यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहे. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन, रासायनिक खतांचा वापर टाळण्यासाठी प्रयत्न, आवास योजनांतर्गत घरे, महिलांना बचतगटांच्या माध्यमातून सक्षम करणे, तसेच दुग्धोत्पादन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय आणि कुक्कुटपालन यांना चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. या प्रयत्नांना अभियानातून प्रोत्साहन मिळणार आहे.

अभियानाचे ७ प्रमुख घटक

१. सुशासनयुक्त पंचायत – पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन

२. सक्षम पंचायत – आर्थिक स्वावलंबन, कंपनी सामाजिक उत्तरदायित्व निधी (उडठ) व लोकवर्गणी

३. जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव – पर्यावरण संरक्षण व पाणी व्यवस्थापन

४. योजनांचे अभिसरण – मनरेगा व इतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी

५. संस्था सक्षमीकरण – शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे यांची बळकटी

६. उपजीविका विकास व सामाजिक न्याय – रोजगार निर्मिती व महिला सक्षमीकरण

७. लोकसहभाग व श्रमदान – ग्रामस्थांचा प्रत्यक्ष सहभाग व श्रमदान

खरं तर सातवा घटक वैशिष्ट्यपूर्ण असून गावकऱ्यांचा थेट सहभाग व श्रमदान याचा अर्थ लोकसहभाग व श्रमदान यातून हे अभियान लोकचळवळ बनणे अपेक्षित आहे. अभियानाला प्रोत्साहन देण्याचे काम पुरस्काराच्या रूपाने होईल. पुरस्कारांसाठी एकूण २४५.२० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एकूण १९०२ यशस्वी स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. या गावांच्या विकास कामांसाठी या ग्रामपंचायतींना मोठा निधी उपलब्ध होईल.

पुरस्कार रचना : राज्यात प्रथम विजेत्या ग्रामपंचायतीस ५ कोटी रुपयांचा राज्यस्तरीय पुरस्कार दिला जाईल. तर द्वितीय ३ कोटी रुपये, तृतीय २ कोटी रुपये पुरस्कार असेल .

विभागस्तरीय पुरस्कार – प्रत्येक विभागात ३ ग्राम पंचायतीना पुरस्कार. प्रथम रुपये १ कोटी, द्वितीय रुपये ८० लाख, तृतीय रुपये ६० लाख

जिल्हास्तरीय पुरस्कार – प्रत्येक जिल्ह्यात ३ ग्राम पंचायतीना पुरस्कार. प्रथम रू ५० लाख, द्वितीय रू ३० लाख, तृतीय रुपये २० लाख

तालुकास्तरीय पुरस्कार :– प्रत्येक तालुक्यात ३ ग्राम पंचायतीना पुरस्कार प्रथम रुपये १५ लाख, द्वितीय रुपये १२ लाख, तृतीय रुपये ८ लाख

विशेष पुरस्कार : प्रत्येकी तालुक्यातील २ ग्राम पंचायतींना प्रत्येकी ५ लाख रुपये पुरस्कार आहे.

विभाग आणि राज्यस्तरावर पंचायत समित्यांसाठी आणि जिल्हा परिषदासाठी ही आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहे.

पंचायत समित्यांना ३ राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतील. प्रथम २ कोटी, द्वितीय १.५ कोटी, तृतीय १.२५ कोटी असे पुरस्कार आहे.

विभागस्तरीय पुरस्कारांमध्ये प्रथम १ कोटी, द्वितीय ७५ लाख, तृतीय ६० लाख रुपये असे आहे

जिल्हा परिषदांना अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी राज्यात ३ जिल्हा परिषदांना पुरस्कार आहेत यात प्रथम ५ कोटी, द्वितीय ३ कोटी, तृतीय २ कोटी असे पुरस्कार दिले जातील.

या अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा असून, एकूण १०० गुणांच्या निकषांवर मूल्यांकन केले जाईल. पारदर्शक प्रशासन, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, रोजगार, पर्यावरण, कर वसुली आणि लोकसहभाग यांचा विचार केला जाईल. प्रत्येक ग्राम पंचायतीने दररोजचा अहवाल विशेष मोबाईल प्लिकेशन आणि वेबसाईटवर सादर करावा लागेल.

अभियानापूर्वी राज्यस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय प्रशिक्षण, तसेच ग्रामसभांच्या माध्यमातून तयारी केली जाईल. व्यापक जनजागृतीसाठी कार्यशाळा, पोस्टर, बॅनर, सोशल मिडिया, यशोगाथा चित्रफीत आणि इतर साधनांचा उपयोग केला जाणार आहे.

राज्य आणि देशाच्या शाश्वत विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण ही प्रगतीची पहिली पायरी आहे. सक्षम युवा पिढी घडवण्यासाठी गावांमध्ये डिजिटल वर्ग, ई–लर्निंग, पुस्तकालये, तसेच कौशल्याधारित प्रशिक्षण केंद्रे स्थापन करणे. यातून युवक युवतींना संगणक, मोबाईल रिपेअरिंग, इलेक्ट्रिक, शिवणकाम, कारागिरी अशा विविध व्यवसाय शिक्षणातून कौशल्य दिल्यास रोजगार निर्मिती व उद्योजकता वाढेल. अशा गावाच्या विकासावर परिणाम करणाऱ्या सर्व घटकांना चालना देण्यावर या निमित्ताने लक्ष दिले जात आहे.

'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' ही केवळ स्पर्धा नसून ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाची दिशा आहे. प्रत्येक ग्रामस्थाने यात सहभाग घेतल्यास गावांचा चेहरामोहरा बदलून शाश्वत विकास साध्य होईल. हे अभियान खऱ्या अर्थाने लोकचळवळीचे दूरदृष्टीपूर्ण पाऊल ठरेल.

◆ पान ४ वरून पुढे...

## मराठ्यांचा ऐतिहासिक...

जीआर काढण्यात येणार असल्याचा शब्द उपसमितीने दिला आहे.

उपसमितीने मागण्या मान्य केल्यानंतर त्याचा तातडीने जीआर काढावा, जीआर काढल्यानंतर एका तासात मुंबई रिकामी करतो असं मनोज जरांगे म्हणाले. मराठ्यांच्या मागण्या मान्य झाल्यानंतर आंदोलकांनी एकच जल्लोष केला.

मराठा उपसमितीच्या शिफारशी काय ?

– हैदराबाद गॅझेटिअरची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी अशी मनोज जरांगे यांची मागणी होती. त्याला शासनाने मान्यता दिली आहे.

– गावातील कुळातील नात्यातील व्यक्तींना चौकशी करुन कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

– सातारा गॅझेटिअरवर अभ्यास करून त्याला जलद मान्यता देण्यात येईल. त्यामध्ये काही त्रुटी आहेत, एका महिन्यात त्याला मान्यता देण्यात येणार आहे.

– मराठा आदोलकांवरील या आधीचे गुन्हे सप्टेंबर अखेर मागे घेण्यात येणार.

– शैक्षणिक पात्रतेनुसार शासकीय नोकरी देणार.

– मराठा आरक्षणाच्या आंदोलनामध्ये बलिदान दिलेल्या वारसांसाठी १५ कोटींची मदत देणार. आठवड्याभरात त्यांच्या खात्यात मदत जमा होईल.

मनोज जरांगे पाटील यांच्या नेमक्या मागण्या काय आणि सरकारचं उत्तर काय ?

१) हैदराबाद गॅझेटिअरियर लागू करा लागू करावे.

सरकारचं उत्तर – हैद्राबाद गॅजेट लागू करण्याची मान्यता उपसमितीने दिली आहे. तात्काळ लागू करणार. जीआर काढणार

◆ पान ४ वरून पुढे...

२) सातारा संस्थान जीआर काढा –

सरकारचं उत्तर –औंध आणि सातारामध्ये काही त्रुटी आहेत. १५ दिवसात कायदेशीर त्रुटींचा अभ्यास करून अंमलबाजवणी केली जाईल. जीआर काढणार

३) मराठा आंदोलकांवरील सरसकट गुन्हे मागे घ्या.

सरकारचं उत्तर – सप्टेंबर अखेरपर्यंत सर्व गुन्हे मागे घेणार, शासन निर्णय जारी करणार.

मराठा आरक्षण आंदोलनमध्ये बळी गेलेल्या कुटुंबियांना १५ कोटी रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य परिवहन मंडळात नोकरी मिळेल.

जर शिक्षण मुलाचा जास्त आले तर सरकारी नोकरीं द्यावी

४) आम्हाला कायद्यात बसणारे आरक्षण द्या.

सरकारचं उत्तर – मराठा आरक्षणावर सरकारच्या समितीने अंतिम मसुदा तयार केला.

५) ५८ लाख कुणबीच्या नोंदी ग्रामपंचायतला लावा म्हणजे लोकांना कळेल नोंदी मिळाल्या. आज २ तारीख आहे आता आता गेल्या गेल्या एक आदेश काढा प्रमाणपत्र अनेकांचे अडकले व्हॅलिडिटी मध्ये त्यावर निर्णय घ्या

उत्तर – जेवढे दाखले आले ते तातडीने द्या असा निर्णय आम्ही घेऊ. आता मनुष्यबळ त्याला दिलं आहे जलदगतीने काम होईल

६) मराठा कुणबी एक आहेत. याची अंमलबजावणी झाली पाहिजे,

उत्तर – किचकट आहे त्याला वेळ लागेल १ महिना लागेल

७) सगेसोयरेचा निर्णय घ्या म्हणालो

उत्तर – याला वेळ लागेल ८ लाख चुकीच्या नोंदी आहेत, त्याबद्दल वेळ लागणार आहे

८) ज्याची कुणबी नोंद सापडली आहे त्याचे सगे सोयरे घ्या. सगेसोयरे पोट जात म्हणून घ्या.

◆ पान ४ वरून पुढे...

सरकारचं उत्तर – गावातील, नात्यातील, कुळातील लोकांना चौकशी करुन कुणबी प्रमाणपत्र देणार

मराठा उपसमितीने मनोज जरांगे यांची भेट घेतली आणि मसुद्यामध्ये काय तरतूद केली आहे याची माहिती दिली. मराठा उपसमितीमध्ये अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री शिवेंद्रराजे भोसले, मंत्री माणिकराव कोकाटे यांचा समावेश होता. या आधी शिंदे समितीने जरांगे यांच्याशी चर्चा केली होती. नंतर यासंदर्भात मराठा उपसमितीशी चर्चा केली. त्यानंतर मराठा उपसमितीने मराठा आरक्षणाचा अंतिम मसुदा तयार केला आणि तो जरांगे यांना दिला.

## मराठा आरक्षणाच्या....

आरक्षणाच्या लढ्याला समाजबांधवांनी मोठा प्रतिसाद देत त्यांच्या मागे मोठी ताकद निर्माण केली.गेली २७ ऑगस्ट पासून चलो मुंबई मोर्चाचा नारादेत लाखोंच्या जनसामुदाय सोबत घेत आझाद मैदान येथे

शुक्रवार दि २९ ऑगस्ट पासून अन्नपाणी त्याग करत उपोषण सुरू केले. जिकडे तिकडे मोठ्या प्रमाणात सर्वत्र मराठा बांधवांची गर्दी झाल्याने मुंबई चे जनजीवन विस्कळीत होऊन मुंबई संपूर्ण ठप्प झाली होती.सरकारला न इलाजास्तव संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मागण्या पूर्ण कराव्या लागल्या मराठा समाजाच्या मागण्याचा निर्णय घोषित होताच वडवणी तालुक्यासह ग्रामीण भागात फटाक्यांच्या आतिषबाजी तोफांची सलामी देत गुलालाची उधळण करत, मनोज दादा जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है,छत्रपती शिवाजी महाराज की जय,जय जिजाऊ जय शिवराय,लढेंगे जितेंगे हम सब जरांगे, एकच पर्व ओबीसी सर्व, ओबीसीचा नेता कैसा हो जरांगे पाटील जैसा हो, जरांगे पाटलाचा बालेकिल्ला बीड जिल्हा बीड जिल्हा अदी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

## पोलिस अधीक्षक...

◆ पान ४ वरून पुढे...

करण्यात आलेल्या गणेशोत्सवाचे औचित्य साधून मंगळवारी पोलिस अधीक्षक नवनित कॉवत यांच्या हस्ते श्रींच्या आरतीचा भव्य कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी आदित्य डेंटल कॉलेज चे प्राचार्य डॉ.हिमांशू , आदित्य आयुर्वेद चे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सतीश कचरे, आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल सानप, आदित्य नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास गर्जे, आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.बालाजी बहिरवाल यांच्यासह सर्व महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पोलिस अधीक्षक नवनित कॉवत यांनी विद्यार्थ्यांसोबत मनमोकळा संवाद साधला. विद्यार्थांना मार्गदर्शनही केले. त्यांनी जीवनात एकोपा, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासण्याचे महत्व विद्यार्थांना पटवून दिले. त्यांनी सांगितले की, गणपती उत्सवाप्रमाणे आपले जीवनही आनंदी आणि उत्साही असावं. ताणतणावात जगण्याऐवजी तणावमुक्त जीवन जगणं हीच खरी प्रगती आहे. प्रसंगी विद्यार्थ्यांनी पोलीस अधीक्षकांना यांच्याशी मनमोकळा संवाद साधत त्यांना विविध सामाजिक उपक्रमांबद्दल माहिती विचारली. महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी पोलीस प्रशासनाबाबतची रांगोळी काढून मान्यवरांचे स्वागत केलं. पोलिस अधीक्षक यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

माणूस उभा आहे वर्दीतला, म्हणून सण साजरा होतोय गर्दीतला– आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने पोलिसांची कार्यतत्परता आणि कर्तव्य कठोरता दाखवणार रांगोळी काढण्यात आली होती. या रांगोळीतून माणूस उभा आहे वर्दीतला, म्हणून सण साजरा होतोय गर्दीतला हा महत्वपूर्ण संदेश देण्यात आला होता. ही रांगोळी पाहुण पोलिस अधीक्षक नवनित कॉवत यांनी विद्यार्थ्यांचे कौतूक करत पोलिसांप्रति असलेली संवेदना रांगोळीतून मांडल्याबद्दल मला आनंद झाल्याच्या भावना व्यक्त केल्या

◆ पान ९ वरून पुढे...

## समंदर खान...

घेऊन त्यांना अंबाजोगाई येथे गटशिक्षणाधिकारी म्हणून संधी देण्यात आली. त्यानंतर आता ते बीड येथे याच गटशिक्षणाधिकारी या पदावर कार्यरत आहेत.मागील २९ वर्षाच्या शासकीय सेवेमध्ये शिक्षण क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय ठरलेले आहे. प्रामुख्याने बीड जिल्ह्यातील ऊसतोडीला जाणार्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात त्यांनी आणले. शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात अन्यायामध्ये त्यांची भूमिका महत्वपूर्ण ठरली. त्यांच्या कार्याची दखल घेऊन महात्मा ज्योतिराव फुले उत्कृष्ट अधिकारी म्हणून त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर बाजमे शामाये अदाब या पुरस्काराने सुद्धा त्यांना सन्मानित करण्यात आले.अशा या हरहुन्नरी आणि शिक्षण क्षेत्रामध्ये क्रांती घडवणारे प्रशासकीय अधिकारी यांना त्यांच्या

◆ पान ९ वरून पुढे...

कार्याची दखल घेऊन समर्थ राजयोगच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून शिक्षक दिनी डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन राज्यस्तरीय आदर्श प्रशासकीय अधिकारी पुरस्कार २०२५ या सन्मानाच्या पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.हा पुरस्कार शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे शानदार राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्यामध्ये त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे.असे संपादक वैभव स्वामी यांनी जाहीर केले आहे. त्यांच्या या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## मनोज दादा...

कायद्याच्या मर्यादेत राहून शांततेत लढा पुढे नेण्याचे आवाहन केले आहे. मनोज दादा हे समाजाचे नेतृत्व करीत आहेत. त्यांच्यावर येणारा कोणताही

◆ पान ९ वरून पुढे...

धोका हा मराठा समाजाच्या भावनांशी निगडित आहे. त्यामुळे राज्य सरकारने संवेदनशीलतेने हा प्रश्न हाताळावा आणि मनोज दादांच्या जीविताच्या सुरक्षेसाठी तात्काळ ठोस पावले उचलावीत, असे ते म्हणाले. दरम्यान, मनोज दादा जरांगे यांच्या नेतृत्वाखालील आरक्षण चळवळीला राज्यभरातून अभूतपूर्व पाठिंबा मिळत आहे. या पार्श्वभूमीवर त्यांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी राज्य सरकारने ठोस उपाययोजना करणे ही काळाची गरज असल्याचे खासदार सोनवणे यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

## 'राधाराणी की...

व्यक्तीला एक लक्ष एकादशी केल्याचे फळ प्राप्त होते असेही त्यांनी सांगितले. श्री श्री राधा गोविंद यांना विशेष पोशाख परिधान करण्यात आला होता व मंदिराला अतिशय सुबक सजावट करण्यात आली होती. दुपारी साडेबारानंतर

◆ पान ९ वरून पुढे...

महाआरती होऊन सुमारे हजारो भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास विशेष सहभाग श्रीमान संत दास प्रभू श्रीमान विठ्ठल आनंद प्रभू श्री श्री राधा गोविंद भक्त समाज सर्व भक्तांचे विशेष सहभाग विशेष सहकार्य लाभले. अशी माहिती इस्कॉन बीड चे प्रतिनिधी श्रीमान कृष्णनाम दास यांनी दिली.

## शुभम धूत...

सहावा वर्धापन दिन आणि शिक्षक दिनाचे औचित्य साधून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे सकाळी ११ वाजता शानदार सोहळ्यामध्ये शाल, श्रीफळ,हार, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.अशी माहिती समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी दिली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बाप्पाच्या निरोपास पावसाची हजेरी; राज्यात पुन्हा मुसळधार!

**मुंबई । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या आगमनापासूनच पावसानं हजेरी लावली आणि आता घरगुती गणरायांच्या विसर्जनाचा दिवस उजाडलेला असतानाही पावसानं काही माघार घेतलेली नाही. उलटपक्षी येत्या दिवसांमध्ये पावसाचा जोर आणखी वाढणार असल्याचा इशारा हवामान विभागानं जारी केला आहे. त्यामुळं बाप्पाच्या निरोपासही पावसाची हजेरी असेल हेच आता स्पष्ट होत आहे.

हवामान विभागानं वर्तवलेल्या प्राथमिक अंदाजानुसार विदर्भातील पूर्वे कडे असणारे जिल्हे, चंद्रपूर, गडचिरोली इथं पावसाचा जोर वाठढणार असून, या भागांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर, कोकणात किनारपट्टी भागांसह रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गसह पश्चिम महाराष्ट्रातील घाटमाथ्यावरील क्षेत्रांमध्येही काळ्या ढगांची दाटी



वाढणार असून, या भागाला पावसाचा मारा सोसावा लागणार आहे. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रातही पावसाची जोरदार हजेरी असल्याची शक्यता वर्तवण्यात आल्यानं या भागांमध्ये हवामान विभागानं यलो अलर्ट जारी केला आहे.

### ● पावसाचा जोर वाढण्यामागचं कारण काय आहे ?

**सध्याच्या घडीला म्यानमारच्या किनाऱ्यालगतच्या सागरी क्षेत्रात चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. यामुळे कमी दाबाचा पट्टा तयार होण्यासाठी पोषक वातावरण तयार झालं आहे.**

का वाढलं पर्जन्यमान ?

हवामान विभागाच्या मुंबई शाखेनं वर्तवलेल्या अंदाजानुसार कोकण आणि गोव्यानजीकच्या घाट क्षेत्रात अतिमुसळधार पावसाचा अंदात असून, मध्यम स्वरुपातील पावसाच्या सरींची शक्यता मराठवाड्यासाठी वर्तवण्यात आली आहे, जिथं वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ४० किमी इतका असेल.

सध्याच्या घडीला म्यानमारच्या किनाऱ्यालगत असणाऱ्या सागरी क्षेत्रामध्या चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली असून, तिथंच कमी दाबाच्या पट्ट्यासाठीसुद्धा पोषक वातावरणनिर्मिती होताना दिसत आहे. ज्यामुळं राज्यात पुन्हा एकदा पावसाच्या ढगांचीच दाटी होताना दिसत आहे. दरम्यान मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये पावसाची रिमझिम आणि अधूनमधून येणाऱ्या जोरदार सरींची हजेरी असेल.

सप्टेंबरअंती पावसाचा जोर ओसरण्यास सुरुवात होणार असून, यादरम्यानच परतीच्या पावसाची सुरुवात होणार आहे. ज्यामुळं काही भागांमध्ये टप्प्याटप्प्यानं तापमानवाढीसही सुरुवात होणार असल्याचा अंदाज हवामान जाणकारांनी वर्तवला आहे.

गणेशोत्सव २०२५ मध्ये महाराष्ट्रात पावसाची परिस्थिती कशी असेल ?

गणेशोत्सवाच्या काळात, विशेषत: विसर्जनाच्या दिवसांमध्ये, महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये मध्यम ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

कोणत्या भागांसाठी ऑरेंज आणि यलो अलर्ट जारी करण्यात आले आहेत? ऑरेंज अलर्ट: विदर्भातील पूर्वेकडील जिल्हे (चंद्रपूर, गडचिरोली), कोकणातील किनारपट्टी भाग (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग)

यलो अलर्ट: मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील काही भागांसाठी यलो अलर्ट

## झुलेलाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी संस्थेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट



**नागपूर । प्रतिनिधी**

गोधनी येथील झुलेलाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी या संस्थेतर्फे श्री गणेश उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज या संस्थेस भेट देऊन 'श्रीं'चे पूजन केले व आरतीत सहभाग घेतला. यावेळी आमदार परिणय फुके, अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान, संस्थेचे अध्यक्ष महेश साधवानी, विरेंद्र कुकरेजा, नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटचे प्रमुख शैलेश जोगळेकर, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, तसेच घनश्यामजी कुकरेला, जयप्रकाश गुप्ता, गिरीष साधवानी, असरानी, संस्थेचे प्राचार्य डॉ. विवेक नानोटी, उपाध्यक्ष एस.ई. चौधरी आदी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लिंबागणेशमध्ये मयुरेश्वराचे राजेशाही थाटात विसर्जन

## 225 वर्षाची एक गाव एक गणपती परंपरा ; गौरी बरोबरच गणेशाचे विसर्जन त्यामुळे गणेशोत्सव 5 दिवसांचा

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती तिर्थक्षेत्र असलेल्या बीड तालुक्यातील लिंबागणेश गावात एक गाव – एक गणपती ची २२५ वर्षांपासून परंपरा आहे. सरकार वाड्यात प्रतिष्ठापित मयुरेश्वर गणेशाची आज ता.२ मंगळवार रोजी आज दुपारी बारा वाजता मुख्य आरती केल्यानंतर छत्री,चौरी,अब्दगिरी,चामर,ध्वज,दंड अशा राजेशाही थाटात सरकार वाड्यातुन मयुरेश्वराची पालखीतुन विसर्जन मिरवणूक सुरू झाली. सरकार वाड्याच्या बाहेर आल्यानंतर बॅण्ड पथक, टाळ मृदंगाच्या गजरात भजनी मंडळींनी ठेका धरत तसेच ढोल ताशाच्या गजरात लेझीम पथकातील तरूणांनी आपले कसब दाखवले.मिरवणुकीसमोर परीट समाजातील बांधव



धोतराच्या पायघड्या घालतात.मोरया हो मोरया जय गजानन मोरया चा जयघोष आसमंतात दुमदमला. मिरवणुकीत परीसरातील १२ गावातील लेझीम पथकांनी मिरवणुकीत सहभाग घेतला. रात्री ९ वाजता भालचंद्र गणपती मंदिराच्या चंद्र पुष्करणी तिर्थात महाआरतीनंतर विसर्जन करण्यात येते.

पालखीसमोर धोतराच्या पायघड्याचा मान परीट समाजाचा तर सजवलेल्या बैलगाडीचा मान कैकाडी समाज बांधवांचा – मयुरेश्वराच्या विसर्जन मिरवणुकीत पालखी समोर धोतराच्या पायघड्या अंथरूण स्वागत करण्याचा मान परीट समाज बांधवांचा असतो तर गावातील मारोती मंदिराला प्रदक्षिणा घातल्यानंतर भाविकांना दर्शनासाठी कैकाडवाड्यात सजवलेल्या बैलगाडीत मयुरेश्वराची मुर्ती पंचक्रोशीतील भक्तांच्या दर्शनासाठी ठेवण्यात येते. हा मान कैकाडी समाज बांधवांचा असतो.

मयुरेश्वर मुर्तीकार उमेश कानिटकर तर मुर्तीसाठी चिखलाचे गोळे मुळुक येथील महादेव आहेरकर पुरवतात

गणेशचतुर्थीला षोडशोपचार पुजा करून सरकार वाड्यात मयुरेश्वर गणेशाची प्रतिष्ठापना केली जाते.वंशपरंपरेने उमेश कानिटकर ही गोजिरी मुर्ती तयार करतात. नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी मुर्तिकाम सुरू होऊन श्रावण वैद्य त्रयोदशीला पुर्ण होते.पोळ्याच्या दुसऱ्या दिवसापासून रंगकाम सुरू होते. मयुरेश्वराच्या मुर्तीसाठी चिखलाचे गोळे पुरवण्याचा परंपरागत मान मुळुक गावचे महादेव आहेरकर यांचा आहे.

गौरी बरोबरच गणेशाचे विसर्जन त्यामुळे ५ दिवसाचा गणेशोत्सव – मागील २२५ वर्षांपासून लिंबागणेश गावाने एक गाव – एक गणपती परंपरा जपली आहे. गौरीबरोबरच गणेशाचे विसर्जन करण्याची इथे परंपरा असल्याने येथील गणेशोत्सव ५ दिवसांचा असतो. गावात दुसरीकडे सार्वजनिक गणपती बसवला जात नाही हे या गावचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

# ओबीसी आरक्षणामध्ये इतर समाजाची घुसखोरी होवु देवु नये

## सकल ओबीसी समाजाचे तहसिलदाराना निवेदन

**माजलगाव । प्रतिनिधी**

सकल ओबीसी समाजाच्या वतीने माजलगावचे तहसीलदार संतोष रुईकर यांना ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लागता इतर जातींना आरक्षण द्या असे निवेदन सकल ओबीसी समाज माजलगाव तालुक्याच्या वतीने देण्यात आला.



आझाद मैदान येथे सुरु असलेले आदोलनाला न जुमानता व मराठा समाजाच्या दबावाला बळी न पडता त्यांचा ओबीसी संवर्गात समावेश करण्यात येऊ नये, या अगोदर ही सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्याचा प्रयत्न केला असता. तो समाज सामाजीक दृष्ट्या मागास नसल्याच्या कारणाने राज्य मागास आयोग व सुप्रिम कोर्ट ने देखील त्यांच्या आरक्षणास नकार दिलेला आहे. त्यांच प्रमाणे मराठा समाजाचा मागासले पण तपासण्यासाठी संवैधानिक पध्दतीने गठित केलेली परंतु असवैधनिक काम करणारी शिंदे समिती बरखास्त करण्यात यावी, शिंदे समितीने गोळा केलेल्या माहितीचे पुनः सर्वेक्षण करण्यात यावे, मागील दोन वर्षात दिलेले बोगस कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यात यावे. व ज्या अधिकार-याने पदाचा गैरवापर करून बोगस कुणबी दाखले दिले, त्यांच्या वर निलंबनाची कारवाही करुण फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे, ओबोसो आरक्षण कर्ते प्रा. लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे, ॲड मंगेश ससाणे व इतर ओबीसी आदोलनक यांच्यावर प्राणघात हल्ले पहाता त्यांना पुरेशे पोलीस संरक्षण देण्यात यावे आदी मागण्याचे निवेदन मा. मुख्यमंत्री महोदयांना तहसिलदार यांच्या मार्फत सकल ओबीसी समाजाच्या वतीने देण्यात आले व दखल न घेतल्यास लोकशाही मार्गने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

# जरांगे पाटलांच्या लढ्याला यश

## शेवटी देवेंद्र फडणवीस यांनीच दिले मराठ्यांना आरक्षण-गणेश लांडे भाजपा जिल्हा सरचिटणीस

**बीड । प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या संविधानिक मागणीला ऐतिहासिक यश मिळाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जरांगे पाटलांच्या आंदोलनाला सकारात्मक प्रतिसाद देत मराठा समाजाला आरक्षण जाहीर केले. विशेष म्हणजे जरांगे पाटलांची प्रमुख मागणी असलेले हैदराबाद गॅझेट लागू करण्यासही सरकारने मान्यता देत त्याबाबतचे जी.आर. जारी केले आहेत.



मुंबई येथे गेले पाच दिवस सुरू असलेल्या जरांगे पाटलांच्या उपोषणाला राज्यभरातून प्रचंड पाठिंबा मिळाला. समाजाच्या हक्कांसाठी त्यांनी घेतलेल्या या लढ्याला अखेर यश आलं. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्णयामुळे संपूर्ण मराठा समाजात उत्साह आणि समाधानाची लाट उसळली आहे. या ऐतिहासिक निर्णयानंतर बऱ्हाणपूर गावात मोठा जल्लोष करण्यात आला. गावकऱ्यांनी फटाके फोडून, ढोल-ताशांच्या गजरात आणि मिठाई वाटप करून आनंदोत्सव साजरा केला. भाजप जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे यांनीही गावकऱ्यांसोबत सहभागी होत मुख्यमंत्री फडणवीस यांचे तसेच जरांगे पाटलांचे आभार मानले. नामदार पंकजाताई मुंडे यांनी सुरुवातीपासूनच जरांगे पाटलांच्या संविधानिक मागण्यांना ठाम पाठींबा दिला होता. त्यांच्या समर्थनामुळे आंदोलनाला अधिक बळ मिळालं होतं. आरक्षण लागू झाल्याने आणि हैदराबाद गॅझेटला मान्यता मिळाल्याने मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणात आणि तरुणांना नोकऱ्यांमध्ये अधिक संधी उपलब्ध होणार आहेत. यामुळे समाजाच्या प्रगतीला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. जरांगे पाटलांचे संघर्षमय आंदोलन, समाजाचा जबरदस्त पाठिंबा आणि मुख्यमंत्री फडणवीस यांची निर्णयक्षमता – या संगमातून आज मराठा समाजासाठी सुवर्णक्षण घडले आहे.

## नेत्रदान पंधरवडा जनजागृती; मरणोत्तरही जग पाहण्यासाठी करा नेत्रदान: डॉ. अर्चना पाटील वरे

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

बुब्बुळामुळे येणारे अंधत्व दूर करण्यासाठी मरणोत्तर नेत्रदान करुन अंध व्यक्तीस बुब्बुळाचे प्रत्यारोपण करणे हा एकमेव मार्ग होय. अशाप्रकारे नेत्रदान करुन आपण दृष्टिचे दान करुन मरणोत्तर ही हे जग पाहू शकतो. त्यामुळे प्रत्येकाने नेत्रदानाचा संकल्प करावा,असे आवाहन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या




नेत्रविभागाच्या प्रमुख डॉ. अर्चना पाटील वरे यांनी केले. नेत्रदान पंधरवड्यानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात 'नेत्रदान व नेत्राची घ्यावयाची काळजी', याबाबत डॉ. अर्चना पाटील वरे यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे अध्यक्षस्थानी होते. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, आदी उपस्थित होते.



*बीड शहरातील सावता नगर, शिवाजी धांडे नगर, बलगुजार येथील आरंभ गणेश मित्र मंडळाच्या श्री गणेशाची आरती करताना ड.गोविंद भैया शिराळे.. यावेळी आरंभ गणेश मित्र मंडळाचे अध्यक्ष अनिल देवतरासे, जगदीश भाऊ नाईक, अक्षय शिराळे,जिजाऊ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष इंजि. देविसिंह शिंदे, महेंद्र वाघमारे, , शेरकर, राऊत तसेच गणेश भक्त दिसून येत आहेत.*

## लोकशाही दिनी २० अर्ज प्राप्त

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिनी जिल्हाधिकारी कार्यालयात आज पार पडला. यावेळी २० तक्रारी अर्ज प्राप्त झाले. जिल्हा परिषद – २ अर्ज, महसुल विभाग – २, पुरवठा विभाग – १, इतर साधे निवेदन १५ असे एकूण २० अर्ज प्राप्त झाले, अशी माहिती सामान्य प्रशासन विभागातून देण्यात आली.

# बाबुजी आव्हाड महाविद्यालयामार्फत आरोग्य माता केंद्र स्वच्छता शिबिर संपन्न

**पाथर्डी । प्रतिनिधी**

बाबुजी आव्हाड महाविद्यालय नेहमीच सामाजिक जाणीव आणि लोकसेवा या उद्दिष्टांसाठी आग्रही भूमिका घेत असते. त्याच सामाजिक बांधिलकीतून महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना +२ स्तर व राष्ट्रीय छात्र सेना व वरिष्ठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने रौप्य महोत्सवानिमित्त आज आरोग्य माता हॉस्पिटल



परिसरात भव्य स्वच्छता शिबिराचे व स्वयंसेवकांना आरोग्य विषयक जनजागृतीचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात स्वयंसेवकांनी सकाळपासूनच उत्साहाने कामाला सुरुवात केली. हॉस्पिटल परिसरातील वाढलेले गवत, रानगवत व झुडपे यांचे निर्मूलन करून परिसर स्वच्छ करण्यात आला. यासोबतच आरोग्य माता हॉस्पिटलच्या आवाराबरोबरच शेजारील फादर यांच्या हेड ऑफिसचा परिसर देखील स्वच्छ करण्यात आला. स्वच्छतेमुळे रुग्ण व नागरिकांना आरोग्यदायी व स्वच्छ वातावरण उपलब्ध होणार आहे. या उपक्रमात कनिष्ठ महाविद्यालयातील स्वयंसेवक तसेच वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट मोठ्या संख्येने सहभागी झाले. सर्वांनी एकत्रितपणे कष्ट करीत समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अरुण राख, प्रा. कॅप्टन अजयकुमार पालवे, प्रा. आनंद घोंगडे, प्रा. सुरेखा चेमटे, प्रा. डॉ. आशा पालवे, सिस्टर शीला, सिस्टर लुसी दिब्रिटो प्रा. माया पवार प्रा. अनिलकुमार नारखेडे, प्रा. भगवान सांगळे तसेच प्रा.संदीप कराड यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व, सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि टीमवर्कची सवय दृढ झाली. महाविद्यालयाचे हे सामाजिक कार्य समाजात आदर्श निर्माण करणारे ठरले असून परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले या उपक्रमास माननीय अभय आव्हाड व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी ए चौरे यांनी शुभेच्छा दिल्या.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १३५८/२०२५**

**अनिल खेमाडे वि. निरंक**

**मागणी :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदारः १. अनिल पि. मारूतीराव खेमाडे, वय: ४४ वर्षे, धंदा नौकरी, रा. आहेर धानोरा, ता. जि. बीड २. बाबासाहेब पि मारूतीराव खेमाडे, वय: ४८ वर्षे, धंदा मजुरी, रा. बीड, ता. जि. बीड

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे मारूती कोंडिबा खेमाडे, राहणार मौजे आहेर धानोरा, ता. जि. बीड हे दिनां २३/१०/२०२४ रोजी मौजे आहेर धानोरा, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले आहेत. मयताची पत्नी नामे दगडाबाई भ्र. मारूती खेमाडे मयत झा आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे मारूती कोंडिबा खेमाडे, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्य येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट मदरहु अर्जदार हा हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत **मारूती कोंडिबा खेमाडे** वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख १४/१०/२०२५ आहे.

आज दिनांक २९/०८/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**(विधीज्ञ – श्री. अर्सुल आर. डी.)**

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • बुधवार, दि. ०३ सप्टेंबर २०२५ • पान ४

# बिंदुसरा धरणावर धोकादायक पर्यटन आणि फोटोसेशन

## प्रशासनाने सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करावी : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे पाली येथील बिंदुसरा धरण भरून वाहू लागल्याने हे ठिकाण पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. मात्र, येथे वाढणारी गर्दी, पर्यटकांची हुल्लडबाजी आणि धोकादायक फोटोसेशनमुळे धरण परिसरातील सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून जिल्हा प्रशासनाने आवश्यक उपाययोजना करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे. लहान मुले, तरुण मंडळी



धरणाच्या पाण्यात व सांडव्यापाशी जात असल्याचे, आंघोळ व फोटोसेशन करत असल्याचे चित्र दिसत आहे. अशा प्रकारामुळे कुठल्याही क्षणी गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सुरक्षा अभावामुळे धोका: धरण परिसरात कोणत्याही प्रकारची सुरक्षा यंत्रणा नाही. पूर्वीही धरणाच्या सांडव्यात दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. त्यामुळे हा परिसर अत्यंत संवेदनशील असून तातडीने उपाययोजना आवश्यक आहेत.

प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत – डॉ.ढवळे: या ठिकाणी सुरक्षारक्षकांची नेमणूक, सुचना फलकांची स्थापना, प्रवेशद्वारावर नियंत्रण, तसेच पाण्यात जाण्यास प्रतिबंधक बंधारे उभारणे यासारखी पावले उचलणे अत्यावश्यक आहे. धरण परिसर पर्यटनासाठी आकर्षक असला तरी जीव धोक्यात घालणारे प्रकार टाळण्यासाठी प्रशासनाने कठोर सुरक्षा व्यवस्था उभी करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेश) यांनी केली आहे.

# अनुकंपाधारक उमेदवारांच्या रिक्तपदाच्या नियुक्तीसाठी मेळावा संपन्न





**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत देण्यात आलेल्या एकुण १ ते ९ टप्यांमधील टप्पा क्र. ५ ( मेळावा घेणे व शिफारस करणे) पूर्ण करण्याच्या अनुषंगाने (दि. ०२) आजरोजी सकाळी ११.०० वाजता प्रतिक्षासूचीतील सर्व अनुकंपाधारक उमेदवार यांचा मेळावा घेवुन रिक्तपदांसाठी पसंतीक्रम विहित नमून्यामध्ये घेण्यात आले.

गट-क संवर्गासाठी एकूण ४३ पदे रिक्त आहेत. या मेळाव्यास एकूण ९२ उमेदवारांपैकी ७९ उमेदवार उपस्थित होते. त्यांच्याकडून पसंतीक्रमाची माहिती विहित नमून्यामध्ये संकलित करण्यात आली. दि. १५ सप्टेंबर, २०२५ रोजी अनुकंपा नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. या मेळाव्यासाठी १७ नियुक्ती प्राधिकारी उपस्थित होते. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे.

# समंदर खान ठरले डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श अधिकारी पुरस्काराचे मानकरी !

**बीड । प्रतिनिधी**

डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श प्रशासकीय अधिकारी पुरस्कार २०२५ हा बीड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी समंदर खान हमीद खान यांना जाहीर झाला आहे. शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून या पुरस्काराचे शानदार वितरण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे होणार आहे. बीड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी समंदर खान हमीद खान यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत महिला अध्यापक विद्यालयामध्ये ३ वर्ष



अध्यापनाचे काम केले. यानंतर नॅशनल उर्दू माध्यमिक शाळेमध्ये ते ८ वर्ष शिक्षक होते. २००५ मध्ये सरळसेवेने ते ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी या पदावर शासन सेवेत दाखल झाले. त्यांच्या कामाची दखल ▶ उर्वरित पान २ वर

# मनोज दादा जरांगे यांच्या आरोग्याची सरकारने काळजी घ्यावी : खा.सोनवणे यांची मुख्यमंत्री यांना मागणी

**बीड । प्रतिनिधी**

मराठा समाजासाठी गेली अनेक वर्षे सातत्याने आंदोलनाच्या माध्यमातून न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र लढा देणारे मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज दादा जरांगे पाटील यांचे आरोग्य आणि जीवित सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी ही राज्य सरकारची आहे. राज्य सरकारने मागण्यावर आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा मागणीचे पत्र बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडनवीस यांना पाठवले आहे.



खासदार सोनवणे आपल्या पत्रात म्हणाले की, मनोज दादा जरांगे हे गेली दोन वर्षे अहिंसक आंदोलनाच्या माध्यमातून मराठा समाजाच्या हक्काचा लढा लढत आहेत. सरकारशी संवाद साधत असतानाही त्यांच्या दि.२९ ागस्ट पासून सुरु असलेल्या व दीर्घकाळ चाललेल्या प्राणांतिक उपोषण आंदोलनामुळे त्यांचे आरोग्यास व जीवितास धोका निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने त्यांना आवश्यक ती सुरक्षा, वैद्यकीय मदत आणि संरक्षण देणे अत्यावश्यक आहे. त्यांनी पुढे सांगितले की, मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत सरकारने ठोस निर्णय घ्यावा. मागील अनेक आंदोलनांत मनोज दादा यांनी उपोषण, जलत्याग अशा कठोर मार्गांचा अवलंब केला. सध्या मुंबई येथे चालू असलेल्या या आंदोलनात त्यांचे आरोग्य गंभीरपणे बिघडले असून त्यांच्या सुरक्षिततेकडे सरकारने विशेष लक्ष दिले पाहिजे. एखादी अप्रिय घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी राज्य शासनावर राहील. खासदार सोनवणे यांनी मराठा समाजातील तरुणांनी ▶ उर्वरित पान २ वर



माजलगाव : सौं. पल्लवी सोळंके यांच्या घरच्या गौरया

# 'राधाराणी की जय'च्या गजरात इस्कॉनमध्ये राधाष्टमी महोत्सव साजरा

**बीड । प्रतिनिधी**

राधा रानी की जय महारानी की जय बरसाने वाले की जय जय गजरात आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ इस्कॉन तर्फे श्री राधा गोविंद मंदिर मध्ये राधाष्टमी महोत्सव मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाला.

पहाटे साडेचार वाजल्यापासून मंदिरामध्ये मंगल आरती शृंगार दर्शन ,सकाळी साडेनऊ वाजल्यापासून राधाराणी यांच्या प्राकट्य दिनाच्या निमित्ताने वैष्णव गीते ,श्री श्री राधाकृष्ण यांचा दूध दही मध व पंचगव्याने महाअभिषेक, श्री राधाराणी यांची विशेष कथा व त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले .



श्री राधा राणी यांच्या कथेमध्ये विशेषत्वाने सांगताना श्रीमान संत दास प्रभू यांनी असे सांगितले की, श्री राधाराणी ही भगवान श्रीकृष्णापासून अभिन्न आहे . पूर्ण पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्ण यांना आनंद प्रदान करण्यासाठी स्वतः श्रीकृष्ण ज्या विस्तार रूपामध्ये आपला विस्तार करतात ती म्हणजे राधा राणी. राधाराणी पासूनच सर्व महालक्ष्मी, दुर्गा, भगवान श्रीकृष्णांच्या पट्टराण्या रुक्मिणी सत्यभामा आदी विस्तारित म्हणून श्री राधा राणी ही भगवंतांहून अभिन्न आहे . पद्मपुराणांमध्ये असा उल्लेख आहे की राधाराणीच्या प्रकट्या दिवशी जो व्यक्ती उपवास करतो त्या ▶ उर्वरित पान २ वर

# शुभम धूत यांना रतन टाटा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

राजयोग फाउंडेशनचे अध्यक्ष युवा सामाजिक कार्यकर्ते शुभम दिलीप धूत यांना दानशूर रतन टाटा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. हा पुरस्कार मान्यवरांच्या शुभहस्ते शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून समर्थ राजयोगच्या वतीने दिला जाणार आहे. बीड येथील युवा समाजसेवक राजयोग फाउंडेशनचे अध्यक्ष तथा नगरसेवक शुभम दिलीप धूत यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन दानशूर रतन टाटा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार



ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा ज्येष्ठ समाजसेवक नितीन चंद्रकोटेच्या यांच्या शुभहस्ते बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी प्रशासकीय अधिकारी पत्रकार यांच्या शुभहस्ते देण्यात येणार आहे हा पुरस्कार शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी दैनिक समर्थ राजयोगचा ▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तीन अर्ज प्राप्त

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये ०३ तक्रार अर्ज प्राप्त झाले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला. यावेळी उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) शैलेस सुर्यवंशी, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी यांच्याकडे महसूल संबधित एकूण तीन तक्रार अर्ज जिल्हा लोकशाही दिनात प्राप्त झाले असून निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी अर्जावर सुनावणी घेऊन संबधित विभागास १५ दिवसात संबधित प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा



**नेकनूर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मेजर ध्यानचंद यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. हे होते. तर या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडा विभागाचे विभाग प्रमुख डॉ. श्रीकृष्ण जाधव हे होते.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. इनकर व्ही.एस. यांनी केले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मेजर ध्यानचंद यांच्या जीवन पटाविषयी माहिती सांगितली व विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे व आपल्या कार्यात नाविन्य मिळविले पाहिजे असे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. श्रीकृष्ण जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मेजर ध्यानचंद यांनी हॉकी या खेळावर आपले प्राबल्य मिळविले हॉकी हे त्यांच्या अंगाला चिटकून गेल्यानंतर त्याचा गोल होत होता एवढे त्यांचे हॉकी खेळावर प्रभुत्व होते. त्यांनी भारताला हॉकी खेळामध्ये जागतिक लेव्हलवर उंच शिखरावर नेऊन ठेवलेले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे व आपल्या ध्येयापर्यंत एकनिष्ठतेने आपले कार्य बजावले पाहिजे मेजर ध्यानचंद यांना १९५६ ला पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला त्यांना भारतरत्न देण्यात यावा अशी बऱ्याच दिवसापासून मागणी करण्यात येत आहे.

### सौ.के.एस.के.महाविद्यालयाचे तीन विद्यार्थी भौतीकशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण



**बीड । प्रतिनिधी**

येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील भौतीकशास्त्र विषयाचे तीन माजी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा मार्फत घेतल्या जाणार्या, सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असणार्या महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा जून २०२५, या परीक्षेस भौतीकशास्त्र विषयात यश संपादन केले. यात श्री.कांबळे शंकर लालासाहेब, श्री. मेरड अर्जुन भास्कर व श्री.बुरांडे धनंजय अरूण हे भौतीकशास्त्र विषयाचे सौ.के.एस.के.महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असून त्यांच्या या यशाबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य व भौतीकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल अध्यक्ष श्री.किशोर काळे, उपाध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर,संस्थेचे सचिव डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर,सहसचिव डॉ.दीपा क्षीरसागर, पूजा भारतभूषण क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ.खान ए.एस., कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा.जालिंदर कोळेकर,तसेच प्रा.डॉ. अशोक डोंगरे,श्री.रूपेश कोकाटे,भौतीकशास्त्र विभागीत सर्व कर्मचारी,तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### बीड बालरंगभूमी परिषदेच्या वतीने गणेश उत्सवानिमित्त अथर्वशीर्ष पठणाच्या उपक्रमाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

येथील बालरंगभूमी परिषद बीड शाखेच्या वतीने गणेश उत्सवाचे औचित्य साधून लहान मुलांवर उत्तम संस्कार होण्यासाठी अथर्वशीर्षाचे पठण हा उपक्रम दिनांक चार सप्टेंबर रोजी राबवत आहे यामध्ये बीड मधील सर्व शाळांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन बीड नाट्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर यांनी केले आहे. बीड येथील सौ के एस के महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये दिनांक चार सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता गणेश उत्सवाचे औचित्य साधून अथर्वशीर्ष पठण उपक्रम राबविण्यात येणार आहे यासाठी बीडमधील शाळा सहभाग नोंदवणार असून एकत्रित अथर्वशीर्ष पठण होणार आहे भारतीय संस्कृती, परंपरा याची माहिती मुलांना असावी त्याच्यांवरती उत्तम संस्कार व्हावे, या उद्देशाने संपूर्ण महाराष्ट्रभर विविध उपक्रम बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष नीलमताई शिर्के-सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली राबवले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून बीडमध्ये सामूहिक अथर्वशीर्ष पठण होणार आहे. या उपक्रमास १ ते १५ वयोगटातील जास्तीत जास्त संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवण्याचे आवाहन बीड बालरंगभूमी परिषदेचे अध्यक्ष तथा बालरंगभुमी परिषदेच्या उपाध्यक्ष दीपा क्षीरसागर, संजय पाटील देवळाणकर, स्नेहल पाठक, यांनी केले आहे.